22100195

International Baccalaureate®
Baccalauréat International
Bachillerato Internacional

**MARATHI A1– STANDARD LEVEL – PAPER 1**
**MARATHE A1 – NIVEAU MOYEN – ÉPREUVE 1**
**MARATHI A1 – NIVEL MEDIO – PRUEBA 1**

Thursday 13 May 2010 (afternoon)
Jeudi 13 mai 2010 (après-midi)
Jueves 13 de mayo de 2010 (tarde)

1 hour 30 minutes / 1 heure 30 minutes / 1 hora 30 minutos

---

INSTRUCTIONS TO CANDIDATES

- Do not open this examination paper until instructed to do so.
- Write a commentary on one passage only. It is not compulsory for you to respond directly to the guiding questions provided. However, you may use them if you wish.

INSTRUCTIONS DESTINÉES AUX CANDIDATS

- N'ouvrez pas cette épreuve avant d'y être autorisé(e).
- Rédigez un commentaire sur un seul des passages. Le commentaire ne doit pas nécessairement répondre aux questions d'orientation fournies. Vous pouvez toutefois les utiliser si vous le désirez.

INSTRUCCIONES PARA LOS ALUMNOS

- No abra esta prueba hasta que se lo autoricen.
- Escriba un comentario sobre un solo fragmento. No es obligatorio responder directamente a las preguntas que se ofrecen a modo de guía. Sin embargo, puede usarlas si lo desea.





© International Baccalaureate Organization 2010

पुढीलपैकी कोणत्याही **एका** उताऱ्याचे रसग्रहण करा.

१.

कालची संध्याकाळ .त्यानंतरची ती रात्र. समोरची पाण्याची मृत्युलाट . समोर दिसतो आहे तो सिग्नलच आहे ना?तोउभा नाही,आडवा पडलेलाही नाही.वाऱ्याच्या झोतानं झाडं उखडतात.पण सिग्नल जमिनीत खोल, सिमेंटमध्ये पक्का बसवलेला असतो.कितीही जोराचा वारा अथवा पाऊस त्याला उखडू शकत नाही इतका तो भक्कम रोवलेला असतो.ह्या सिग्नललाही मुळापासून वादळाला उखडता आलेलं नव्हतं; पण त्याला पिरगळून काढावं असे तिढे पडलेले होते.डावी बाजू,उजवीबाजू कोणती हे ओळखता येऊ नये असे तिढे.त्या लोखंडी,निर्जीव सिग्नलच्या यातनांची डिसिल्व्हाला कल्पना आली.त्याचं अंग शहारलं.मरणापूर्वी काय यातना होतात? माणसांना ,जनावरांना, झाडांना ,सिग्नलना ! त्या वेदना डिसिल्व्हाप्रमाणे फर्नांडिसलाही जाणवल्या.त्या पाहून त्याला चेव आला.हे चक्रीवादळ माणसांना मारतं, जनावरांना मारतं, पण आपण त्यातून ही रेल्वे पुढच्या स्टेशनपर्यंत नेऊ शकतो. ह्या जिद्दीला ते नमवू शकत नाही.

फर्नांडिस इंजिनमधून खाली उतरू लागला.डिसिल्व्हानं त्याला विचारलं,

''काय करतो आहेस?''

जर गाडीला तासापेक्षा जास्त वेळ झाला आणि स्टेशनला ठरल्याप्रमाणं ती पोहोचू शकली नाही तर त्या स्टेशनवरून एक रेल्वेचा माणूस काय झालं,हे पाहायला पाठवला जातो.तो त्या स्टेशनपासून चालत रेल्वे जिथं उभी असेल तिथवर येतो.गाडीला उशीर का झाला, आणि मधले रूळ, पूल ,रस्ता व्यवस्थित आहे ना, हे पाहतो. तसा रिपोर्ट तो इंजिनड्रायव्हरला देतो.इथं पुढच्या स्टेशनवरून कोणी आलेला नव्हता. इंजिन -ड्रायव्हरलाच आता रस्ता नीट आहे ना, हे पाहिलं पाहिजे.

फर्नांडिस म्हणाला,

''पाण्यामुळं रूळ दिसत नाहीत;पण ते जागेवर आहेत की नाहीत हे मी पाहतो.माझ्या मागून गाडी येऊ देत.''

''शुद्ध वेडेपणा !''डिसिल्व्हा मनाशी म्हणाला.पण गाडी इंचाइंचानं पुढं जाईल, तरी त्याला ती न्यायची होती.गाडीला सिग्नल देण्यासाठी त्यानं इशारा दिला; पण प्रत्युत्तर आलं नाही.त्यानं इंजिनमधून खाली वाकून पाहिलं.गार्डदेखील खाली उतरलेला होता.रेल्वेच्या लाइनला समांतर खांब असतात.त्यांना गार्डजवळ असणारा टेलिफोन जोडता येतो.गार्डला ह्या टेलिफोनवरून पुढच्या स्टेशनाशी बोलता येतं.मी नेमका कुठं थांबलो आहे हे सांगता येतं.ह्या प्रयत्नात गार्ड होता.पण इतक्या दुरून डिसिल्व्हाच्या लक्षात आलं,की गार्डला पुढचा स्टेशनमास्तर काही मिळत नाही.भारतात कधी परदेशसारखे गार्ड आणि इंजिनड्रायव्हर आणि पुढच्या स्टेशनमास्तरशी बोलण्यासाठी वॉकीटॉकी येतील, माहीत नाही. पण आज तरी फर्नांडिस करतो आहे, तोच मार्ग आहे. फर्नांडिसला कदाचित ह्या पाण्यातून दोन, तीन मैल चालावं लागेल. आणि त्याच्या गतीनं गाडी न्यावी लागेल, पण गाडी पुढं तर जाईल. इथं एकाच जागी थांबण्याऐवजी ते बरं.

ड्रायव्हरसाठी जे नियम आहेत त्यात हे स्पष्ट केलं आहे, की जिथं रूळ पाण्याखाली गेले आहेत,तिथं ड्रायव्हरनं जिथं आहे तिथंच थांबावं.गाडी पुढं नेण्याचा धोका कधीही पत्करू नये. मग आपण हे काय करतो आहोत?

इट्स मॅडनेस! तो फर्नांडिस मॅड, त्याबरोबर तो गार्ड आणि आता आपणही.

(प्रभाकर पेंढारकर ; चक्रीवादळ ; मौज प्रकाशन; १० मार्च २००५; पृ.३४-३५ )

- या उताऱ्यातून व्यक्त झालेल्या अनुभवाविषयी काय म्हणता येईल?
- या उताऱ्यातील व्यक्तिरेखाटनासंबंधी चर्चा करा.
- वातावरणनिर्मितीसाठी लेखकाने योजलेल्या निवेदनपद्धतीबद्दल काय म्हणावेसे वाटते?
- या उताऱ्याच्या संरचनेबाबत काय जाणवते?

२.

## उदासीनता

कोठुनि येते मला कळेना
उदासीनता ही हृदयाला?
काय बोचते ते समजेना
हृदयाच्या अंतर्हृदयाला?
येथे नाही तेथे नाही ,
काय पाहिजे मिळवायाला?
कुणीकडे हा झुकतो वारा?
हाका मारी जीव कुणाला?
मुक्या मनाचे मुके बोल हे ;
घरे पाडिती पण हृदयाला !
तीव्र वेदना करिती; परि ती
दिव्य औषधी कसली त्याला?

(बालकवी; बालकवीची कविता; संपा.गो.गो.अधिकारी; सारस्वत प्रसारक मंडळी; १९२५,पृ.६१)

– या कवितेतून व्यक्त होणाऱ्या भावाविष्काराबद्दल काय म्हणता येईल?

– कवितेच्या शब्दयोजनेसंबंधी अभिप्राय द्या.

– ही कविता वाचून आपल्या मनात कोणती प्रतिक्रिया उमटते?